

कार्ल – बागेतून बाहेर निघ.!

कैरोलस लिनिअस

ने प्रत्येक गोष्टीचे नामकरण केले

कैथरीन स्टॉक

चित्र: अनीता सांचेज़

मराठी: अश्विनी बर्वे

ब्लोबॉल?

पिग थूथन?


पिवळा डेझी?

पिवळ्या रंगाची फूले
येणारे रानटी फुलझाड?



त्याचे बरोबर नाव काय होते?

तरुण कार्ल लिनीला निश्चितपणे माहित नव्हते – आणि इतर कोणालाही नाही!डॉक्टर, गार्डनर्स, शेतकरी - प्रत्येकजण - वनस्पती आणि प्राण्यांच्या नावांवर वाद घालत होता. जर शास्त्रज्ञांना वनस्पतींच्या नावांवरही एकमत नसेल, तर ते त्यांच्याबद्दल चर्चा आणि संशोधन कसे करणार? कार्लला एकच उपाय माहित होता: जगातील प्रत्येक सजीवाला एक वैज्ञानिक नाव देणे. पण ते खूप मोठं काम होतं. तो ते कार्य पूर्ण करू शकेल का?





कार्ल – बागेतून बाहेर निघ!

कैरोलस लिनिअस

ने प्रत्येक वस्तूचे नामकरण केले





"जर तुम्हाला वस्तूचे नाव माहित नसेल तर आपण त्या गोष्टीबद्दल असलेले ज्ञान विसरून जातो." - कैरोलस लिनिअस

कार्ल – बागेतून बाहेर निघ!

कैरोलस लिनिअस

ने प्रत्येक वस्तूचे नामकरण केले





कार्ल लिने परत बागेत गेला होता.

तो बागेच्या बाहेर राहू शकत नव्हता.

कार्ल, बागेच्या बाहेर निघ! कार्लच्या आईने आदेश दिला आणि आत येऊन अभ्यास कर. आईने स्वप्न बघितले होते की एक दिवस कार्ल एक प्रोफेसर, वकील, किंवा स्वीडनमध्ये त्यांच्या स्टेनब्रोल्ट पैरिशच्या मोठ्या चर्चमध्ये एक चांगला पाद्री होईल.

पण कार्ल शाळेच्या अभ्यासाला उबला होता. म्हणून तो नेहमी दिवसभर बागेत फिरत असे.






“या बागेने लहानपणापासून माझ्या मनात,झाडांच्या प्रती एक अतूट प्रेम जागवले आहे.”

“एवढेच नाही तर जेव्हा कार्ल एक छोटा मुलगा होता, तेव्हाही त्याला झाडांविषयी प्रेम होते. त्याचा जन्म १७०७ च्या वसंतात झाला. जेव्हा तो रडे तेव्हा त्याचे आईवडील त्याला शांत करण्यासाठी एक फुल देत असत. जसे तो चालायला शिकला, कार्ल आपल्या वडिलांच्या बागेत फिरू लागला. जेव्हा तो थोडा मोठा झाला तेव्हा त्याने आपल्या वडिलांना प्रत्येक झाडाचे नाव विचारले आणि त्यांना ते सांगायला लावले.

आणि किडे! कार्ल त्यांचे अनेक तास निरीक्षण करत असे. पट्टेरी, केसाळ, मोठमोठे डोळे आणि खूप पाय असणारे किडे. त्यांची नावे काय होती?

कार्ल, बागेच्या बाहेर निघ! त्याच्या आईने परत त्याला आपल्या शाळेची पुस्तके वाचण्यास सांगितले. पण कार्ल गोगलगाय बघण्यात व्यग्र होता.








कार्लला बाग खूप आवडत असे,पण त्याला शाळेत खूप वेळ ग्रीक आणि लैटिन शिकणे आवडत नसे. नाराज शिक्षकांनी कार्लच्या आईवडिलांना सांगितले की त्यांचा मुलाकडे चर्चचा पाद्री होण्याइतकी पुरेशी बुद्धी नाही.


कार्लच्या वडिलांनी निराश होऊन त्याला एका चांभाराकडे प्रशिक्षण देण्याचा विचार केला. पण एक दोन शिक्षकांनी कार्लचे झाडांबद्दल असलेल्या प्रेमाचे कौतुक केले. आणि सुचवले की हा मुलगा डॉक्टर होऊ शकतो. त्या काळात औषधे झाडांपासून तयार होत असत. म्हणून कार्ल अजूनही आपला खूप वेळ बागेत घालवू शकत होता.

कार्लने चपला शिवण्याच्या ऐवजी मेडिकल कॉलेजमध्ये जाण्याचे ठरवले. शेवटी त्यांच्या आईवडिला अनिच्छेने तयार झाले, “तुला जे करण्यात मजा वाटते, त्यातच तू काहीतरी चांगले करशील.” त्याचे वडील म्हणाले.



कार्लचे आईवडील त्याच्या शिक्षणासाठी जास्त पैसे देऊ शकत नव्हते. कार्ल नेहमी भुकेला राहत असे. तो दिवसातून एकदाच जेवून खुश होत असे. तो आपले झिजलेले बूट झाडावर टांगत असे आणि अनवाणी पायाने चालत असे.पण त्याने पूर्ण लक्ष देऊन कष्टाने अभ्यास केला. आणि लवकरच त्याने लोकांचे आजार बरा करण्यासाठी झाडांचा उपयोग करायला सुरुवात केली. फक्त एक अडचण होती. कोणते झाड ते होते?







डॉक्टर, माळी, शेतकरी – प्रत्येक ठिकाणी – झाडांच्या नावावर खूप वाद होत असे. डंडेलिओनला तो ब्लोबॉल, डुकराची तोंड किंवा पिवळ्या डेजीला वेगवेगळ्या नावे होती. आणि ते यावर सुद्धा अवलंबून असे तुम्ही कोणत्या शहरात राहत आहात. काही झाडांना तर वेगवेगळी तीस चाळीस नावं होती.

डॉक्टर झाडांसाठी लांबलचक, अवघड अशी ग्रीक किंवा लॅटिन नावे वापरत असत. पण ते एका कोणत्या नावाशी सहमत नसत.

कार्लने कुत्रा चावला तर त्यावरचा उपाय म्हणून एक सुंदर गुलाबी रंगाच्या गुलाबाचा उपयोग केला. पण तो गुलाब योग्य होता का? एका डॉक्टरांनी त्याला *रोजा सिल्वेस्ट्रिस इनोडोरा सेउ कैनिना* म्हटले, दुसऱ्याने त्याला रोजा *सिल्वेस्ट्रिस अल्बा कम रूबोर फोलियो ग्लैब्रो म्हटले.*

“नावांच्या बाबतीत एवढी अव्यवस्था!" कार्ल रडला . "भयानक शब्दजाल!"

“झाडांच्या प्रजातीचे नावं अधिकांश चुकीची होती.”



प्राण्यांच्या बाबतीत सुद्धा लोक असमंजस होते. वटवाघुळ एक प्रकारचा पक्षी होता का? व्हेल माशा सारखे काही होते का? वैज्ञानिकांमध्ये त्यावरून वाद – भांडणे झाली.

कार्लने गोष्टी व्यवस्थित करण्याचा निर्णय घेतला. त्याने अव्यवस्था व्यवस्थित करण्यासाठी आणि प्रत्येक गोष्टीला एक स्पष्ट आणि सरळ नाव देण्याची योजना तयार केली.

पण जगात लाखो जीव होते: हत्ती, मास, कोबी, फुलपाखरे, झेब्रा, कोब्रा, डैफोडील्स – हे एक खूप मोठे काम होते! कार्ल ते काम करू शकत होता का?






कार्ल लिन आत्ता आत्ता शिक्षण पूर्ण करणारा युवक होता, पण तो आव्हानांना घाबरत नव्हता. त्याने आपल्या बाह्या वर केल्या आणि तो कामाला लागला.

सगळ्यात आधी त्याने सजीव जगाला दोन भागात विभागले. वनस्पती जगत आणि पशु जगत.

मग त्याने प्रत्येक साम्राज्य समुहात वाटले ज्यांना त्याने वर्ग म्हटले.

त्याने झाडांना त्यांच्या फुलांच्या रचनेनुसार चोवीस वर्गात विभागले. त्याने प्रत्येक झाडाला एक लैटिन नाव दिले.

प्रत्येक नावाचे केवळ दोन भाग होते. ते खूप छोटे होते. म्हणून त्यांना लक्षात ठेवणे सोप्पे होते.

कुत्रा चावल्यावर उपचारासाठी वापरला जाणारा गुलाब आता *कैनिना* झाला होता :कुत्रा गुलाब.





Rosa canina

रोज़ा कैनिना

"जोपर्यंत पृथ्वी असेल तोपर्यंत ती प्रत्येक वसंत ऋतुत या फुलांनी झाकली जाईल.
तेव्हा झिनिया आपले गौरवशाली नाव कायम सुरक्षित ठेवेल."





कार्लने एका नंतर एक झाडांची नावे ठेवली- आणि त्याला नवीन नावांची कधी कमतरता भासली नाही.

त्याने झाडांची नावे त्यांच्या सुगंधानुसार ठेवले, किंवा त्यांच्या केसाळ, काटेरी किंवा गुळगुळीत असण्याच्या आधारावर ठेवले. नेहमी तो झाडांची नावे आपल्या आवडीच्या लोकांच्या नावावरून ठेवत असे. त्याने आपल्या आवडीचे शिक्षक ओलोफ रुडबेक यांच्या नावावरून एका सुंदर सोनेरी फुलाचे नाव *रुडबेकिया हिरटा ठेवले.*


कार्लने आपल्या बागेतल्या झाडांना नावे दिली, त्याने जंगले आणी शेतातल्या झाडांना नावे दिली.

त्याने अधिक झाडांचा शोध घेण्यासाठी स्वीडनच्या उत्तरेला स्थित लैपलैंडमध्ये हजारो मैलांचा प्रवास केला.

लैपलैंड एक थंड, सड़कविहीन जंगल होते. कधी-कधी कार्ल आपल्या खांद्यापर्यंत असलेल्या बर्फाच्या पाण्यातून चालत असे. त्याने लिहले, “छोट्या किड्यांची झुंड... माझे तोंड, नाक आणि डोळे भरून जात असे. नेहमी त्याच्याकडे खाण्यासाठी मासे आणि बारशिंगाच्या दूधाशिवाय खायला काहीच नव्हते.

कार्लने झाडांची माहिती गोळा करण्यासाठी कडक थंडीचा सामना केला. हात आणि गुडघ्यावर रांगत त्याने छोट्या छोट्या मासांचा शोध घेतला. उंच झाडांवर चढत, त्याने पाईन वृक्षाचे शंख गोळा केले. त्याने अशा झाडांचा शोध लावला ज्यांना वैज्ञानिकांना कधीच बघितले नव्हते.

कार्लचे आवडीचे एक गुलाबी जंगली फूल होते ज्यात दोन फुले आणि चमकदार सदाबहार पाने होती. फुलांचा सुगंध गोड होता. नंतर त्या जंगली झाडाला कार्लच्या नावाने संबोधू लागले: *लिनिया बोरेलिस किंवा* उत्तरेकडचा लिने.




कार्ल, जनावरांचे वर्गीकरण करतांना सुद्धा घाबरला नाही. उंट, जेलिफ़िश, लेडी बग्स, टोळ, कासव, शार्क - ते सगळे जीवित जीव जे उडत होते, किंवा रांगत होते- कार्लला त्या सगळ्यांसाठी वैज्ञानिक नाव ठेवण्याची इच्छा होती.

पण जनावरे अनेक वेगवेगळ्या आकारांचे असतात. तो हे करू शकेल का? आणि मग तो ते काम कुठून सुरु करू शकेल?

"बुद्धिमत्तेचे पहिले पाऊल आहे –

गोष्टी स्वतः समजून घेणे"






कार्ल म्हणे, “सत्य प्रत्यक्ष निरीक्षणाद्वारे समजू शकते.” म्हणून तो आपल्या प्रयोगशाळेत जनावरांची रचना आणि आतील त्याची रचना यांचे निरीक्षण करत असे.

कार्लने वटवाघळाच्या तोंडात वाकून त्यांचे दात बघितले, त्यांना चोच नव्हती. त्याने वटवाघळाच्या त्वचेला स्पर्श केला आणि समजून घेतले की त्यांना पंख नाही तर कातडी आहे. इतर वैज्ञानिकांनी विचार केला की वटवाघुळ पक्षी आहे, पण कार्लने ते चुकीचे ठरवले.

कार्ल त्या वैज्ञानिकांशी असहमत होता जे व्हेलला मासा समजत असत. कार्लने निर्णय घेतला की व्हेल स्तनधारी आहे कारण तो जिवंत बाळांना जन्म देतो. आणि आपल्या गालफडातून नाही तर फुफुप्सातून श्वास घेतो. त्याने उंदीर आणी व्हेल यांना एका समुहात टाकले. तो वेडेपणा वाटला,पण कार्लाला जीवांची आंतरिक रचना माहीत होती.





कार्लने पशु जगताला वेगवेगळ्या वर्गात विभाजित केले.

क्लास क्वाड्रुपीडिया (स्तनधारी)

क्लास एव्स (पक्षी)

क्लास मीन (मासे)

क्लास उभयचर (उभयचर आणि सरीसृप)

क्लास इंसेक्टा (किडे)

क्लास वर्मी (किडे आणि इतर विविध अपृष्ठवंशी)

मग त्याने त्यात एक नवीन गट जोडला. वर्ग "पैराडॉक्सा" त्या जानवरांसाठी होता ज्यांच्या अस्तित्वाबाबत अफवा होत्या. जसे यूनिकॉर्न किंवा ड्रेगन. कार्लला या गोष्टीची जाणीव होती की ते वास्तवात नसतील. पण जर ते सापडले तर कार्लने त्यांच्यासाठी सुद्धा एक जागा तयार केली.

जसे त्याने वनस्पतीचे केले तसेच कार्लने प्रत्येक प्राण्यांनासुद्धा दोन नावं दिली. त्याने मधमाशीचे नाव *एपिस* (मधमाशी) *मेलिफेरा* (मध देणारी) ठेवले. त्याने कुत्र्याची नावे *कैनिस* (कुत्रा) *फेमिलेरिस* (परिचित) ठेवले.

कार्लला माहित होते माणूस सुद्धा प्राणीच आहे. त्याने मनुष्याला होमो (मानव) *सेपियन्स* (बुद्धिमान) म्हटले.



ऑर्डर लेपिडोप्टेरा

परिवार पैपिलिओनोइडिया

जीनस पैपिलियो

प्रजाति पैपिलियो पॉलीक्सेन
किंवा ब्लैक स्वॉलोटेल


कार्लचे काम संपले होते का? अजून नाही! कार्लला लहानपणापासूनच किड्याविषयी प्रेम होते. पण जेव्हा क्लास इन्सेक्टाच्या आयोजनाची गोष्ट आली तेव्हा त्याच्यासमोर एक खूप मोठे काम होते. मुंग्या,पतंगे, एफिड्स, रातकिडे. गांधील माशी . . . आणि भुंगा! तो हे काम करू शकेल का?

कार्लने हे समजून घेण्यासाठी हजारो किड्यांचा अभ्यास केला की कोणत्या गोष्टीने त्यांना एकसारखे बनवले आहे. त्याने किटकांना समुहात विभाजित केले ज्याला त्याने वर्गवारी म्हटले.

चमकणारे, रंगीत टरफलांनी झाकलेले पंखांच्या किड्यांना लेपिडोप्टेरा क्रम दिला. फुलपाखरे आणि पतंगे.

पुढचे पंख कठीण असणाऱ्या पंख्यांच्या किड्यांना त्याने कोलोप्टेरा वर्गवारीत ठेवले: भुंगा त्याने मुंग्या,मधमाश्या आणि गांधील माश्यांना बघीटेल- त्यांचे छोटे कंबर आणि तेज डंख – यांचा विचार करून त्याने त्या सर्वांना हाइमनोप्टेरा वर्गात टाकले.

कार्लने प्रत्येक वर्गाला एका कुटुंबात विभाजित केले. मग त्याने प्रत्येक कुटुंबाला इतर छोट्या समुहात विभाजित केले. प्रत्येक समूहाला एक जीन्स म्हटले जात असे आणि प्रत्येक जीन्सची प्रजातीने तयार होत असे.



कार्लने उत्सुकतेने आपल्या नवीन विचारांच्या बाबत पुस्तके लिहिली. पण जेव्हा दुसऱ्या वैज्ञानिकांनी ते वाचले तेव्हा त्यांना खूप राग आला. अनेक प्रसिद्ध वनस्पतिशास्त्रज्ञ आणि प्राणीशास्त्रज्ञ यांनी आपले जीवन अशा मोठ मोठ्या नावांचा शोध घेण्यात घालवले होते. जसे हाइपोबीएचटीकारपोडसीएनजोरंट. जेव्हा एका तरुण वैज्ञानिकाने त्यांचे काम बंद केले तेव्हा त्यांना खूप राग आला.

आणि जवळपास सर्वजण याबाबत सहमत होते आणि त्यांचे एकमत होते की कार्लने एक खूप मोठी चूक केली आहे. त्याने माणसाला नाव दिले होते जसे मानव एखादा प्राणी आहे. यापेक्षा वाईट म्हणजे त्याने माणसाला डुक्कर आणि गोरिला आणि मांजरी आणि चिंपांझी यांच्यासारख्या स्तनधारी वर्गात घातले होते.

जोहान सिगेसबेक नावाच्या वनस्पतिशास्त्रज्ञाने कार्लच्या कामाला "घृणित" म्हटले होते. पोपने कार्लच्या पुस्तकांवर बंदी घातली आणि आदेश दिला की ती जाळून टाकली जावीत.

कार्लने स्वतःवरचा ताबा घालवला. "बेअक्कल आणि मूर्ख!" तो म्हणाला. पत्र पाठवून अपमानाचे आदान –प्रदान करत दोन व्यक्तीमध्ये कटुतापूर्वक लढाई झाली. "पण कार्लजवळ शेवटचे शब्द होते- त्याने एक केसाळ, दुर्गंध सोडणाऱ्या तृणाचे नाव सीजेसबेकच्या नावावरून ठेवले. ते नाव होते *सीजेसबेकिया ओरिएंटलिस* .



"तो स्वतःला दुसरा ॲडम समजतो आणि आपल्या आधीच्या वैज्ञानिकांच्या कामाची पर्वा न करता सगळ्या प्राण्यांना नाव देत फिरत आहे." - अल्ब्रेक्ट वॉन हॉलर

अखेरीस कार्लच्या लक्षात आले की वादविवाद करून काही उपयोग होणार नाही. त्यांनी लिहिले, "वादात वाया घालवण्यासाठी वेळ खूप मौल्यवान आहे." म्हणून त्यांनी फक्त प्राणी आणि वनस्पतींचे नाव ठेवले.कार्ल देखील एक शिक्षक होता. त्याचे शाळेचे वर्ग किती कंटाळवाणे होते ते त्याला आठवले. म्हणून त्याने हजारो वनस्पतींनी भरलेल्या आपल्या बागेचा जिवंत पाठ्यपुस्तक म्हणून उपयोग केला. तो जंगलात आणि गवताळ प्रदेशात रोमांचक सहलीला गेला. या मोहिमांमध्ये त्यांनी शेकडो विद्यार्थ्यांनाही सोबत घेतले, ज्यांना सकाळपासून रात्रीपर्यंत त्यांच्यासोबत राहावे लागले. कार्ल आणि त्याच्या विद्यार्थ्यांनी बॅनर घेऊन आणि वाद्य वाजवत मोर्चा काढला. जेव्हा जेव्हा एखाद्याला असामान्य वनस्पती दिसली तेव्हा कार्ल त्वरीत तेथे जायचे आणि हात आणि गुडघे टेकून त्याचे परीक्षण करायचे. जर वनस्पती दुर्मिळ नमुना असेल तर तो विद्यार्थ्यांना बिगुल वाजवायला सांगायचा.

"प्रत्येक गोष्टीत, अगदी सामान्य गोष्टींमध्येही आश्चर्य शोधा."





कार्लचे विद्यार्थी जसजसे मोठे झाले तसतसे त्यांच्यापैकी बरेच जण निसर्गाचा अभ्यास करण्यासाठी दूरवरच्या ठिकाणी गेले. त्यांनी अरबस्तान, भारत, रशियाला भेट दिली. चीन, ऑस्ट्रेलिया, आफ्रिका, जपानसह जगभर प्रवास केला. आणि तो जिथे गेला तिथे त्याने लोकांना कार्लच्या कल्पनांबद्दल शिकवले. त्याने पाहिलेल्या किंवा शोधलेल्या सर्व नवीन वनस्पती आणि प्राण्यांबद्दल त्याने त्याच्या आवडत्या शिक्षकाला लिहिले. यामुळे कार्लला निश्चितपणे जाणवले की तो अजूनही त्याचे मोठे कार्य पूर्ण करण्यापासून दूर आहे. कार्लच्या विद्यार्थ्यांनी त्याला उष्णकटिबंधीय बेटे, आर्क्टिक पर्वत शिखरे, वाळवंटातील नमुने पाठवले. डझनभर, शेकडो, हजारो नमुने त्याच्या अभ्यासाच्या टेबलांवर आणि शेल्फ् 'चे अव रुप पसरले होते: कॅनडातील तुती, चीनचे रेशीम किडे, भारतातील समुद्री कवच, इजिप्तमधील वॉटर लिली. त्याच्याकडे जिवंत प्राणी देखील होते - उत्तर अमेरिकेतील रॅकून आणि दक्षिण अमेरिकेतील एक पोपट. तो त्या सर्वांची नावे देऊ शकेल का?


होय! कार्लने “वनस्पती आणि प्राणी” च्या बारा हजार पेक्षा जास्त प्रजातींचे वर्गीकरण केले आणि त्यांना नावे दिली. कार्लने उत्तम काम केले! त्याने विज्ञानाची एक नवीन भाषा तयार केली आणि लोकांचा जगाकडे पाहण्याचा दृष्टीकोन बदलला.





मग डॉक्टर, शेतकरी, बागायतदार – प्रत्येकाने कार्लची स्पष्ट आणि सोपी प्रणाली वापरण्यास सुरुवात केली. कार्लची कीर्ती पसरली आणि मग त्याच्यावर पुरस्कार आणि पदकांचा वर्षाव सुरू झाला. राजे-राण्या त्याची पुस्तके उत्सुकतेने वाचू लागले.1757 मध्ये, कार्ल लिने यांना स्वीडनच्या राजाने "नाइट" ही पदवी दिली. राजा ॲडॉल्फ फ्रेडरिकने त्यांना "नाइट ऑफ द ऑर्डर ऑफ द पोलर स्टार" ही पदवी दिली. हा बहुमान मिळवणारे ते पहिले शास्त्रज्ञ होते. त्यानंतर कार्लने स्वतःला एक अधिक लक्षणीय लॅटिन नाव दिले: "कॅरोलस लिनियस".आपल्या कुलीनतेचे प्रतीक म्हणून त्याने अंगरखाही तयार केला. बहुतेक लोकांनी त्यांचे अंगरखे सजवण्यासाठी सिंह किंवा ड्रॅगन सारखे भयानक प्राणी निवडले. पण कार्लने लॅपलँडमधून गोड-गंध असलेले ट्विनफ्लॉवर Linea borealis फ्लॉवर निवडले.





एक श्रीमंत आणि प्रसिद्ध माणूस झाल्यानंतरही, कार्ल बागेत काम करत राहिला. त्याने जगभरातून आणलेल्या हजारो प्रजाती - केळीची झाडे, वन्य ट्यूलिप्स, वॉटर लिली, कोको बुश, लॉरेल झाडे - आणि त्यांची सुंदर जुळी फुले लावली. औषधासाठी वनस्पती, अन्नासाठी वनस्पती, शिकण्यासाठी वनस्पती, आनंदासाठी वनस्पती. त्याच्या बागेत माकडे, पोपट, मोर हिंडत होते. कार्ल म्हणाला, "मी माझ्या वनस्पती आणि प्राण्यांमध्ये राजापेक्षा अधिक आनंदी राहतो." कार्ल कधीही त्याच्या बागेतून बाहेर गेला नाही!





"पूर्वी माझ्याकडे झाडे होती पण पैसे नव्हते - पण आता झाडांशिवाय या पैशाचा उपयोग काय?"

"लिनिअस जाड किंवा बारीक नव्हता, सडपातळ, तपकिरी डोळ्यांचा, चपळ, वेगवान होता. सर्व काही त्वरित करत असे. विलंब सहन न करणारा; तो प्रभावशाली, संवेदनशील होता,त्याच्या कामात अथक परिश्रम करणारा होता आणि त्याने स्वत: लाही कामाच्या बाबतीत माफ केले नाही. (कार्लने हे वर्णन स्वतः लिहिले आहे.)

प्रसिद्धी आणि यश मिळवल्यानंतरही कार्लने आपले काम करणे सोडले नाही. त्याने आपल्या प्रदीर्घ आयुष्यात निसर्गावर संशोधन आणि अभ्यास सुरू ठेवला. कार्ल तरुण निसर्गवाद्यांच्या मनात एक ठिणगी पेटवण्यास उत्सुक होता आणि तो अनेकदा आपल्या विद्यार्थ्यांना विनामूल्य शिकवत असे. कार्लने नवीन बागा तयार करणे सुरूच ठेवले. "एखादे झाड मेले तर," तो म्हणाला, "त्याच्या जागी दुसरे झाड लावा."त्याच्या आयुष्याच्या शेवटच्या दिवसात, कार्लला त्याच्या प्रिय वनस्पतींची काळजी घेण्यासाठी खाली उतरणे आणि बागेत फिरणे कठीण झाले. त्यामुळे त्याने आपल्या बेडरूममध्येच बाग बनवली. त्याने वनस्पतिशास्त्राच्या पुस्तकांमधून वनस्पतींची चित्रे काढली आणि त्याच्या खोलीच्या भिंती हाताने रंगवलेल्या फुलांच्या मोठ्या चित्रांनी झाकल्या.कार्ल मरण पावला तेव्हा सर्व स्वीडनने दुःख व्यक्त केले. मशाल पेटवून, त्यांच्या महान निसर्गवादीला अखेरचा निरोप देण्यासाठी प्रचंड जनसमुदाय रस्त्यावर उतरला. आजही जगभरातील निसर्गप्रेमी 2 मे हा कार्लचा वाढदिवस "लिनियस डे" म्हणून साजरा करतात.शास्त्रज्ञ दरवर्षी नवीन वनस्पती आणि प्राणी शोधतात म्हणून, नवीन नावांचा विचार करताना ते कार्लच्या कल्पना वापरतात. आणि कार्लला माहीत होते की, लाखो प्रजाती अजूनही शोधण्याची वाट पाहत आहेत.कार्लची मोठे काम कधीही संपणार नाही!



नावांबद्दल एक टीपहे मजेदार आहे की

जो माणूस त्याच्या अचूक नामकरण कौशल्यासाठी प्रसिद्ध झाला, कार्ल, त्याची स्वतःची अनेक नावे होती. त्याच्या कुटुंबाच्या जमिनीवर उभ्या असलेल्या प्राचीन लिन्डेन वृक्षावरून त्यांनी त्याचे आडनाव "लिने" निवडले. त्यामुळे कार्लने आपल्या आयुष्याची सुरुवात "कार्ल लिन" म्हणून केली.

नाईट झाल्यानंतर, कार्लने आपला नवीन उदात्त दर्जा दर्शविण्यासाठी "व्हॉन लिने" हे नाव वापरले. ज्याप्रमाणे त्याने वनस्पती आणि प्राण्यांसाठी लॅटिन नावे वापरली, त्याचप्रमाणे त्याने स्वतःच्या नावाच्या लॅटिन आवृत्त्या वापरल्या आणि आज कार्लला इतिहासात "कॅरोलस लिनियस" म्हणून ओळखले जाते.

वैज्ञानिक वर्गीकरण

कार्लने अनेक वर्षांच्या मेहनतीनंतर आपली वर्गीकरणाची प्रणाली विकसित केली. द्विपदी (दोन-शब्द) नामकरणावर सेटल होण्यापूर्वी त्यांनी अनेक भिन्न नामकरण पद्धतींवर प्रयोग केले.शास्त्रज्ञ आजही लिनियसच्या प्रणालीचे मूलभूत घटक वापरतात.

उदाहरणार्थ, भुंकणारा, रडणारा प्राणी ज्याला आपण "कोयोट" म्हणतो त्याचे वर्गीकरण खालीलप्रमाणे केले जाईल:

किंगडम : एनिमिलीया (प्राणी)फिलम.

कॉर्डाटा (कॉर्डेट्स: पाठीचा कणा असतो)

वर्ग: सस्तन प्राणीऑर्डर:

कार्निव्होरा श्रेणी: कॅनिडे (कुत्रे)वंश:

कॅनिस (कुत्रा) प्रजाती:

लॅट्रान्स (बार्किंग) कोयोटचे वैज्ञानिक नाव Canis latrans आहे.

वैज्ञानिक नावे नेहमी इटेलिक मध्ये लिहिली जातात.

जीनस नेहमी मोठ्या अक्षरात लिहिली जाते:

परंतु दुसरे नाव, ज्याला विशिष्ट नाव म्हणतात, नेहमी साध्या लहान अक्षरांमध्ये लिहिले जाते. जर नावामागे L असेल तर त्याचा अर्थ असा होतो की हे नाव मूळतः लिनियसने ठेवले होते.



अनेक बदल

विज्ञान नेहमीच विकसित होत असते. कालांतराने शास्त्रज्ञांनी लिनिअन प्रणालीमध्ये बरेच बदल केले आहेत, उदाहरणार्थ, आता बुरशी आणि बॅक्टेरियासाठी अतिरिक्त राज्ये आहेत. राज्य फायला नावाच्या गटांमध्ये विभागलेले आहे. आता सस्तन प्राण्यांच्या वर्गाला Quadrupedia ऐवजी Mammalia म्हणतात. आणि आता कार्लपेक्षा वनस्पती आणि प्राण्यांचे बरेच वर्ग आहेत. त्यांनी सरपटणारे प्राणी उभयचरांमध्ये विलीन केले, परंतु आता ते स्वतंत्र गटात आहेत.कार्लप्रमाणे, शास्त्रज्ञ गट कसे तयार केले जावेत यावर वादविवाद करतात. कार्लप्रमाणे, तो सजीवांच्या संरचनेचा अभ्यास करतो - मग ते फुले, मासे, पक्षी किंवा अमीबा असोत - ते आत कसे व्यवस्थित आहेत हे पाहण्यासाठी. कार्लने त्याच्या काळात भिंग वापरला. पण आज शास्त्रज्ञ डीएनएचे विश्लेषण करण्यासाठी इलेक्ट्रॉन मायक्रोस्कोप आणि संगणक वापरतात. त्यांना असे आढळून आले आहे की सारख्या दिसणाऱ्या काही गोष्टी एकमेकांशी संबंधित असतातच असे नाही. भविष्यात, वर्गीकरणाच्या विज्ञानात आणखी बदल होतील.कार्लने हजारो वनस्पती आणि प्राणी गोळा केले आणि ओळखले. त्यांचा विशाल संग्रह आता लंडनमधील लिनियन सोसायटीच्या मालकीचा आहे. आणि कार्लची बाग स्वीडनमधील हॅमर्बी येथे त्याच्या घराबाहेर अजूनही भरभराट आहे, जिथे फिकट फुलांची चित्रे अजूनही त्याच्या बेडरूमच्या भिंती सजवतात.आश्चर्याचा शोधकार्लला नैसर्गिक जगात नेहमीच सौंदर्य आणि उत्साह आढळतो. म्हातारपणीही, तो अंथरुणातून उडी मारायचा आणि नाइटशर्ट आणि नाईट कॅपमध्ये नवीन वनस्पती किंवा पक्षी शोधण्यासाठी बागेत पळत असे. "निसर्ग तुमची पावडर आणि विग घालण्याची कधीच वाट पाहत नाही," तो आपल्या तरुण विद्यार्थ्यांना सांगत असे. कार्लसोबत राहण्यासाठी विद्यार्थ्यांना वेगाने पुढे जावे लागले.कार्लला निसर्गातील प्रत्येक गोष्टीत आश्चर्य वाटले: भव्य व्हेल, चमकदार बीटल किंवा लहान गुलाबी जंगली फूल. आजूबाजूला पहा - तुम्हाला आश्चर्य वाटेल असे काय दिसते



सनावळी

१७०७: कार्ल लिनीचा जन्म 23 मे रोजी दक्षिण स्वीडनमधील रुशुल्टे या छोट्या गावात झाला. त्याचे कुटुंब दोन वर्षांनंतर स्टेनब्रोहोल्ट येथे गेले.

१७२७: कार्ल लंड विद्यापीठात वैद्यकशास्त्राचा अभ्यास करण्यासाठी गेला.

१७२९: वयाच्या बाविसाव्या वर्षी कार्लने जगातील सर्व वनस्पती, प्राणी आणि खनिजे यांचे वर्गीकरण करण्याचे काम सुरू केले.

१७३२ : कार्लने हजारो मैलांचा प्रवास केला आणि सामी - लॅपलँडच्या स्थानिक लोकांसोबत राहत असताना वनस्पती गोळा करण्यात महिने घालवले.

१७३५: कार्लच्या Systema Naturae (Nature's Systems) या पुस्तकाची पहिली आवृत्ती प्रकाशित झाली. या पुस्तकाने निसर्गाच्या तीन राज्यांचे (वनस्पती, प्राणी आणि खनिजे) वर्गीकरण करण्याची त्यांची प्रणाली सादर केली.

१७३९ कार्लने सारा लिसा मोरियाशी लग्न केले. त्यांना सात अपत्ये झाली, पण दोघे बालपणीच मरण पावले. त्याचा मुलगा कार्ल ज्युनियर निसर्गवादी बनला, पण कार्लच्या मुलींना फार कमी शालेय शिक्षण मिळाले.

१७५३: कार्लचे पुस्तक प्रजाती प्लँटारम प्रकाशित झाले, ज्यात हजारो वनस्पती प्रजाती आणि त्यांचे वर्गीकरण सूचीबद्ध केले गेले. हे पुस्तक आधुनिक वैज्ञानिक वर्गीकरणाचा आधार मानले जाते.

१७७५ : स्वीडनचा राजा अ‍ॅडॉल्फ फ्रेडरिक यांनी कार्लला "नाइट" ही पदवी दिली.

१७७८: कार्ल मरण पावला आणि त्याला स्वीडनच्या उपसाला कॅथेड्रलमध्ये पुरण्यात आले.

१७८८: कार्लचे संग्रह आणि कागदपत्रे लंडनमधील लिनेन सोसायटीचा आधार बनली, ही संस्था नैसर्गिक इतिहासाच्या अभ्यासासाठी समर्पित आहे.



